महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
संचालनालय, लेखा व कोषागारे,
" कस्तुरी बिल्डीग" तळ मजला, जे.टाटा मार्ग,
पेट्रोलियम हाऊस समोर, चर्चगेट, मुंबई ४०००२०

दूरध्वनी क्रमांक ०२२-२२८८०११६/११८ Extn-४११ EMail ID :- aotm-dat@mah.gov.in

क्र.संलेको/कोषा/सलेअ-१/नस्ती क्र.१४/प्रोत्साहन भत्ता/२०२५/106 दिनांक : 18 FEB 2026

प्रति,

सहसंचालक,
लेखा व कोषागारे, नागपूर विभाग, नागपूर.

विषय : नक्षलग्रस्त क्षेत्र वगळल्यानंतर आदिवासी क्षेत्र असलेल्या गावात कार्यरत कर्मचा-यांना एकस्तर अगर मूळ वेतन देण्याबाबत.

संदर्भ : १. आपले पत्र क्र. ससंलेवको/चंद्रपूर/न.क्र.४/सुधा. नक्षल./०८-२०२५/१९२८ दि.०७.०८.२०२५.

२. या कार्यालयाचे पत्र क्र.संलेको/कोषा/सलेअ-१/नस्ती क्र.१४/प्रोत्साहन भत्ता /२०२५/६२६/५८१ दि.२४.११.२०२५.

३. आपले पत्र क्र.सलेको/कोप्र-४/न.क्र.४/नक्षल-आदीवासी/११-२०२५/२९०४ दि.२४.११.२०२५.

उपरोक्त विषयाचे आपले संदर्भीय पत्रानुसार गृह विभाग शासन निर्णय दि.२७.०६.२०२५ अन्वये सुधारीत नक्षलग्रस्त भाग घोषित केल्याने त्यामध्ये चंद्रपूर जिल्हा पूर्णपणे वगळण्यात आल्याने प्रोत्साहन म्हणून एकस्तर पदोन्नतीचा लाभ सुरु ठेवावा किंवा कसे याबाबत संचालनालयाकडे पाठविलेल्या मार्गदर्शनार्थ प्रस्तावाच्या अनुषंगाने आपले संदर्भीय क्र. (३) च्या पत्रान्वये आपण खालील प्रमाणे धारणा व्यक्त केली आहे.

गृह विभाग, शासन निर्णय दिनांक २७.०६.२०२५ अन्वये नक्षलग्रस्त भाग वगळण्यात आला असला तरीही आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय दिनांक ०९.०३.१९९० अन्वये घोषित करण्यात आलेल्या आदिवासी उपाययोजना क्षेत्रामध्ये चंद्रपूर जिल्हयातील तालुके व गावांचा समावेश आहे. हा शासन निर्णय कायम असून सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक ०६.०८.२००२ नुसार शासन निर्णय दिनांक ०९.०३.१९९० मध्ये उल्लेखित केल्यानुसार आदिवासी क्षेत्रातील अधिकारी / कर्मचारी यांना एकस्तर वेतनश्रेणी देय राहील. तसेच सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक दिनांक १२.०८.२०२५ मधील मुद्दा क्र.२ नूसार आदिवासी बहुल क्षेत्राकरीता अनुज्ञेय करण्यात आलेला एकस्तर पदोन्नतीच्या वेतन निश्चितीचा लाभ अबाधित ठेवण्यात आला आहे. त्यामुळे आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय दि.०९.०३.१९९० नूसार घोषित आदिवासी उपाययोजना क्षेत्रात एकस्तर पदोन्नतीचा लाभ अनुज्ञेय होतो.

D:\AAO TM\TIPANI LETTER\एकस्तर आदिवासी विभाग.docx

Scanned with OKEN Scanner

उपरोक्त प्रमाणे आपण व्यक्त केलेली धारणा कायम करण्यास येत असून त्यानूसार कार्यवाही करण्याच्या यथोचित सूचना आपले स्तरावरुन कोषागार अधिकारी चंद्रपूर यांना निर्गमित करण्यात याव्यात.

तसेच आपले दि.०८.०८.२०२५ च्या पत्रान्वये प्रस्तुत प्रकरणी देयके पारित करताना शासन मार्गदर्शन प्राप्त झालेनंतर ही रक्कम वसुलपात्र ठरत असल्यास देय वेतनातून सदर रक्कम वसूल करणे बंधनकारक राहील अशा आशयाचे हमीपत्र संबंधित आहरण व संवितरण अधिका-याकडून घेण्यात यावे, अशा सूचना चंद्रपूर कोषागार अधिकारी यांना देण्यात आलेल्या आहेत. तथापि सदर सूचना हया प्रचलीत शासन निर्णयाशी विसंगत असल्याने हमीपत्रावर देयके पारित करण्याचे कोणतेही शासन आदेश नाहीत त्यामुळे आपण दिलेल्या सूचना हया अधिक्रमित करण्यात याव्यात. तसेच येथून पुढे नियमात नसलेल्या सूचना न देण्याची दक्षता घेण्यात यावी.

(दीपा देशपांडे)
संचालक
लेखा व कोषागारे,
महाराष्ट्र, मुंबई.

D:\AAO TM\TIPANI LETTER\एकस्तर आदिवासी विभाग.docx

Scanned with OKEN Scanner